सत्यमेव जयते

# नागरिकांची सनद

## राज्य आरोग्य  हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा रुग्णालय आवार,
गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८
दुरध्वनी क्रमांक- ०२२- २४९९९२०३/०४/०५
Website: - www.jeevandayee.gov.in

# प्रस्तावना

राज्यातील पिवळी शिधापत्रिकाधारक, अंत्योदय अन्न योजना व अन्नपुर्णा योजना, केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंब व अवर्षणग्रस्त १४ जिल्हयातील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंब तसेच नोंदणीकृत बांधकाम कामगार कुटुंबांना **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेव्दारे** प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.१.५ लक्ष रकमेपर्यंतच्या विमा संरक्षणाच्या माध्यमातून दर्जेदार व गुणवत्तापुर्ण वैद्यकीय उपचार नि:शुल्क पुरविण्यात येत आहेत. केंद्र शासनाने सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेतील लाभार्थ्यांसाठी '**आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना**' राज्यात दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून लागू केली आहे. या योजनेव्दारे प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५ लक्षाचे विमा संरक्षण अनुज्ञेय आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी या सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनीमार्फत दि. १ एप्रिल,२०२० रोजीपासून एकत्रितरित्या राबविण्यात येत आहे. युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनीमार्फत एकत्रित योजनेत रु.१.५ लक्षापर्यंतचे विमा संरक्षण पुरविण्यात येत असून रु.१.५ लक्षापुढील ते रु.५ लक्षापर्यंतचे संरक्षण हमी तत्त्वावर राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून पुरविण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२३ मे,२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये कोरोना-१९ साथरोगाच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांसाठी मर्यादीत कालावधीसाठी खुली करण्यात आली आहे. शासनाने या निर्णयास अलीकडे दि.३१ मार्च,२०२१ पर्यंत मुदतवाढ दिली असून राज्यातील कोरोनाचा वाढता प्रार्दुभाव विचारात घेऊन माहे जुन,२०२१ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. कोरोना साथरोगाच्या काळामध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना नागरिकांसाठी खऱ्या अर्थाने 'जीवनदायी' ठरली आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांचा सर्व सामान्य नागरिकांना माहिती प्राप्त व्हावी याकरिता राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यात येत आहे. ही नागरिकांची सनद सर्व सामान्य नागरिकांसाठी नेहमीच खुली असेल आणि सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा विचार करुन या सनदेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील. राज्य आरोग्य हमी सोसायटी नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास नेहमी कटीबध्द आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा राज्यातील अधिकाधिक नागरिकांना लाभ घेण्याचे याव्दारे आवाहन करण्यात येत आहे. या योजनांमधून लाभार्थी रुग्णांना वैद्यकीय उपचार/शस्त्रक्रिया उपलब्ध करण्याकरिता या योजनेचे सर्व अधिकारी/कर्मचारी कर्तव्य भावनेने व कर्तव्य तत्परतेने सतत प्रयत्नशील राहतील याची मी हमी देत आहे.

डॉ. सुधाकर शिंदे<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>
राज्य आरोग्य हमी सोसायटी

# राज्य आरोग्य हमी सोसायटी

शासन निर्णय क्र.मफुयो-२०१६/प्र.क्र.३३१/आरोग्य-६, दि.१२ ऑगस्ट,२०१६ अन्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना विमा कंपनीच्या सहभागाने राबविण्यासाठी तसेच वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार इतर महत्त्वाच्या वैद्यकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट,१८६० (१६८० चा अधिनियम क्र.२१) च्या तरतुदीनुसार, 'राज्य आरोग्य हमी सोसायटी' स्थापन करण्यास व सदर अधिनियमातील तरतुदीनुसार पंजीबध्द करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्देशानुसार, 'राज्य आरोग्य हमी सोसायटी' पंजीबध्द करण्यात आली आहे.

राज्य आरोग्य हमी सोसायटीचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज तसेच अधिपत्याखालील योजनांचे नियंत्रण व नियमन मुख्य कार्यकारी अधिकारी पाहतात. मुख्य कार्यकारी अधिकारी हे अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांना सहाय्य करण्याकरिता मुख्यालय स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्तीय सल्लागार व सहाय्यक संचालक (आरोग्य सेवा) हे प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी तसेच अन्य कंत्राटी अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापक व जिल्हा स्तरावर जिल्हा समन्वयक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना – सर्वसाधारण माहिती

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY): महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी आरोग्य विमा योजना आहे. योजनेंतर्गत निवडक आजारांवर शासकीय व खाजगी अंगीकृत रुग्णालयांमार्फत पात्र शिधापत्रिकाधारक व अन्य लाभार्थी गटांना नि:शुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. ही योजना पूर्वी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना या नावाने ओळखली जात होती व दि.२ जुलै, २०१२ पासून आठ जिल्हयांत लागू करण्यात आली होती व त्यांनतर दि.२१ नोव्हेंबर,२०१३ मध्ये संपुर्ण महाराष्ट्र राज्यात विस्तारीत करण्यात आली होती. शासन निर्णय दि.१३ एप्रिल, २०१७ अन्वये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना' या नावाने सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली असून दि. १४ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेच्या नावात 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' अशी सुधारणा करण्यात आली आहे.

**आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB-PMJAY):** आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही भारत सरकारची आरोग्य विमा योजना असून दि.२३ सप्टेंबर, २०१८ पासून राज्यात लागू करण्यात आली. सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना, २०११ च्या यादीतील (SECC database) कुटुंब या योजनेचे लाभार्थी आहेत. सदर योजना राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रितरित्या सुरु करण्यात आली. ही योजना विमा आणि हमी तत्त्वावर राबविण्यात येत आहे.

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात दि. १ एप्रिल, २०२० रोजीपासून लागू करण्यात आली आहे. मे. युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड (सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी) एकत्रित योजनेतील लाभार्थ्यांना रु.१.५ लक्ष रकमेपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण विमा तत्त्वावर पुरवित आहे. पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक (प्रधानमंत्री जन

आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांसह) लाभार्थी कुटुंबांच्या वतीने राज्य आरोग्य हमी सोसायटी प्रति कुटुंब प्रति पॉलिसी वर्ष रु.७९७/- विमा रक्कम त्रैमासिक हप्त्यांमध्ये विमा कंपनीस अदा करीत आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसाठी महाराष्ट्र शासनाकडून संपुर्णत: निधी प्राप्त होत आहे तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाकडून अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात निधी प्राप्त होत आहे.

**लाभार्थी:**

१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी:

| गट | लाभार्थ्यांचा तपशील |
|---|---|
| गट अ | महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्हयांमधील अन्न व नागरी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून वितरीत करण्यात आलेल्या पिवळी शिधापत्रिका, अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिका व केशरी (रु.१ लक्षापर्यत वार्षिक उत्पन्न ) शिधापत्रिकाधारक कुटुंबे. |
| गट ब | अवर्षणग्रस्त १४ जिल्हयातील (औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा) शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे |
| गट क | १. शासकीय अनाथाश्रमातील मुले, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक<br>२. माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांचेवर अवलंबित असलेले कुटुंबातील सदस्य.<br>३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जिवित नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे. |

२) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी: सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेच्या वंचित व व्यावसायिक निकषानुसार अनुक्रमे ग्रामीण व शहरी क्षेत्रातील कुटुंबांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

| क्षेत्र | लाभार्थ्यांचा तपशील |
|---|---|
| शहरी | शहरी भागातील खालील ११ व्यावसायिक गटातील कामगार योजनेसाठी पात्र आहेत.<br>• कचरा वेचक<br>• भिक्षुक<br>• घरगुती कामगार<br>• गटई कामगार/ मोची/फेरीवाले/रस्त्यावर सेवा पुरविणारे अन्य कामगार<br>• बांधकाम कामगार/ प्लंबर/ गवंडी/कामगार/ रंगारी/ वेल्डर/सुरक्षा रक्षक/हमाल व डोक्याने भार वाहणारे अन्य कामगार<br>• सफाईगार/स्वच्छक/ माळी<br>• घरकाम करणारे/ हस्तकला कारागीर/शिंपी<br>• वाहतूक कर्मचारी/ चालक/ वाहक/ चालक व वाहकांचे मदतनीस/हातगाडी ओढणारे/सायकल रिक्षा ओढणारे<br>• दुकानात काम करणारे/ सहाय्यक/ लहान आस्थापनांमधील शिपाई/ मदतनीस/ अटेण्डट/ वेटर<br>• वीजतंत्री/ मेकॅनिक/ असेम्ब्ली / दुरुस्ती करणारे<br>• धोबी व वॉचमन |

| | |
|---|---|
| ग्रामीण | ग्रामीण भागाच्या एकूण ७ वंचित निकषांपैकी, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये खालील सहा वंचित निकषातील (D1 to D5 and D7) किमान एक निकषात बसणाऱ्या कुटुंबांचा व आपोआप समाविष्ट (बेघर, भिक्षुक, मुलत: आदिवासी समूह, सफाई कामगार कुटुंबे व कायदेशीर बंधपत्रित कामगार) निकषांतील कुटुंबांचा समावेश होतो.<br>• D1- कच्च्या भिंती व कच्च्या छताच्या एका खोलीत राहणारे कुटुंब<br>• D2- १६-५९ वयोगटातील प्रौढ सदस्य नसलेले कुटुंबे<br>• D3- १६-५९ वयोगटातील प्रौढ पुरुष सदस्य नसलेले कुटुंब<br>• D4- दिव्यांग कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे<br>• D5- अनुसूचित जाती व जमाती मधील कुटुंबे<br>• D7- भूमिहीन मजूराची कुटुंबे |

**पात्रता आणि ओळख:**

१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी:

| गट | पात्रतेचे निकष |
|---|---|
| गट अ | सर्व पात्र लाभार्थ्यांची ओळख पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा योजना शिधापत्रिका व त्यासोबत फोटो ओळखपत्र (वैध ओळखपत्रांच्या यादीनुसार) याव्दारे पटविली जाईल. |
| गट ब | महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त १४ जिल्हयांतील शेतकऱ्यांची पात्रता लाभार्थ्यांचे / कुटुंब प्रमुखाचे नाव असलेल्या ७/१२ उताऱ्यासह शुभ्र शिधापत्रिका किंवा लाभार्थी हा शेतकरी असल्याचे/शेतकरी कुटुंबातील सदस्य असल्याचे नजीकच्या महसुल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व लाभार्थ्याचे फोटो ओळखपत्र (वैध ओळखपत्रांच्या यादीनुसार) याव्दारे निश्चित केली जाईल. |
| गट क | लाभार्थ्याची पात्रता कोणतेही ओळखपत्र/ आरोग्य पत्र/ राज्य आरोग्य हमी सोसायटीने ठरविल्यानुसार निश्चित केली जाईल. |

२) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थी: सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना,२०११ मध्ये नोंदीत कुटुंबांतील सदस्य प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयात संगणकीकृत ई-कार्ड व फोटो ओळखपत्र दाखवून लाभ घेऊ शकतात. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत एका राज्यातील रुग्ण देशातील दुसऱ्या कोणत्याही राज्यातील अंगीकृत रुग्णालयांत जाऊन शस्त्रक्रिया/उपचारांचा लाभ घेऊ शकतो.

- पात्रता निकषाच्या कागदपत्रासोबत स्विकारण्यात येणाऱ्या वैध ओळखपत्रांची यादी :

<table>
<tr><td>पॅन कार्ड</td><td>वाहनचालक परवाना</td><td>मतदार ओळखपत्र</td><td>दिव्यांग प्रमाणपत्र</td></tr>
<tr><td>शाळा/कॉलेज ओळखपत्र</td><td>पासपोर्ट</td><td>स्वातंत्र्य सैनिक ओळखपत्र</td><td>रा.गां.जी.आ.योजनेचे ओळखपत्र</td></tr>
<tr><td colspan="2">आधार कार्ड / लाभार्थ्याच्या फोटोसह आधार नोंदणीपत्र</td><td colspan="2">फोटोसह राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक</td></tr>
<tr><td colspan="2">केंद्र शासन/ राज्य शासनाने निर्गमित केलेले जेष्ठ नागरिक ओळखपत्र</td><td colspan="2">सैनिक कल्याण बोर्डाकडून वितरीत केलेले सैन्यदलातील माजी कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र</td></tr>
<tr><td colspan="2">सागरी मच्छिमार असल्याचे ओळखपत्र (कृषी/</td><td colspan="2">राज्य शासन/ केंद्र शासनाने वितरीत केलेले अन्य</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| मत्स्यव्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांची वितरीत केलेले) | कोणतेही ओळखपत्र |
| ओळखपत्राचा पुरावा म्हणून आधार कार्डचा आग्रह धरण्यात येईल आणि आधार कार्ड/ क्रमांक उपलब्ध नसल्यास, आधार कार्ड तयार करण्यासाठी स्विकारण्यात येणाऱ्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र स्विकारण्यात येतील. | |

**वार्षिक विमा संरक्षण मर्यादा :**

**महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)::**

१. या योजनेंतर्गत एका **पॉलिसी वर्षात* लाभार्थ्यावर प्रति कुटुंब ₹१,५०,०००/- पर्यंत झालेल्या सर्व रुग्णालयीन खर्चाचा समावेश होतो. मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा प्रति कुटुंब प्रति **पॉलिसी वर्ष* ₹ २,५०,०००/- इतकी आहे.

२. योजनेचा लाभ कुटुंबातील एकाला किंवा सर्व सदस्यांना घेता येतो म्हणजेच प्रकरण परत्वे एकूण ₹ १.५ लक्ष किंवा ₹ २.५ लक्ष खर्चाचा लाभ **पॉलिसी वर्षात* कुटुंबांतील एक किंवा सर्व सदस्य घेऊ शकतात.

**आयुष्मान भारत — प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB-PMJAY):**

१. या योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या १२०९ उपचारांकरिता देशातील कोणत्याही राज्यातील अंगीकृत रुग्णालयात दाखल झालेल्या महाराष्ट्र राज्यातील लाभार्थ्याला प्रति कुटुंब प्रति **पॉलिसी वर्ष* ₹५ लक्षापर्यंत आरोग्य कवच पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे अन्य राज्यातील पात्र लाभार्थी देखील महाराष्ट्रातील कोणत्याही अंगीकृत रुग्णालयात दाखल होऊन या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

२. या योजनेचा लाभ कुटुंबांतील एका किंवा सर्व सदस्यांना घेता येतो म्हणजेच ₹५ लाखापर्यंतच्या रुग्णालयीन खर्चाचा लाभ *पॉलिसी वर्षात* कुटुंबांतील एक किंवा सर्व सदस्य घेऊ शकतात.

३. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत ₹ १.५ लक्षापर्यंचे विमा कवच विमा कंपनीमार्फत पुरविण्यात येते तर ₹ १.५ लक्षापुढील ते ₹ ५ लक्षापर्यंतचे कवच राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत हमी तत्त्वावर पुरविण्यात येते.

*पॉलिसी वर्ष — चालू वर्षातील १ एप्रिल ते पुढील वर्षातील ३१ मार्च

**उपचारांचा समावेश:**

एकत्रित योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये निवडक ३४ विशेष सेवा प्रकारांतर्गत झालेल्या शस्त्रक्रिया व चिकित्सा यावरील नि:शुल्क उपचारांचा समावेश आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ शस्त्रक्रिया/चिकित्सा/उपचार आणि १२१ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा समावेश आहे. तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १२०९ शस्त्रक्रिया/चिकित्सा/उपचार (म.ज्यो.फु.ज.आ. योजनेतील ९९६ उपचार +अतिरिक्त २१३ उपचार) समाविष्ट असून यामध्ये १८३ (म.ज्यो.फु.ज.आ. योजनेतील १२१ सेवा + अतिरिक्त ६२ सेवा) शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा (follow up packages)अंतर्भाव आहे.

| अ.क्र. | विशेष सेवा प्रकार | अ.क्र. | विशेष सेवा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | जळीत | २ | ह्दयरोग |
| ३ | ह्दयरोग शस्त्रक्रिया व उपचार | ४ | आकस्मिक सेवा |
| ५ | त्वचारोग | ६ | अंत:स्त्राव संस्थेचे विकार |
| ७ | कान, नाक व घसा रोग | ८ | सर्वसाधारण औषधशास्त्र चिकित्सा |
| ९ | सर्वसाधारण शस्त्रक्रिया | १० | व्याधी चिकित्सा |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | संसर्गजन्य आजार | १२ | इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी |
| १३ | जठरांत्रमार्गाचे रोग | १४ | कर्करोगावरील औषधोपचार |
| १५ | नवजात व बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन | १६ | मुत्रपिंड विकार |
| १७ | मज्जातंतूचे विकार | १८ | मज्जातंतूच्या विकारावरील शस्त्रक्रिया |
| १९ | स्त्री रोग व प्रसुती शास्त्र | २० | नेत्ररोग शस्त्रक्रिया |
| २१ | अस्थिव्यंग शस्त्रक्रिया | २२ | बालरोग शस्त्रक्रिया |
| २३ | बालरोग कर्करोग | २४ | प्लास्टीक सर्जरी |
| २५ | आस्कमिक वैद्यकीय उपचार | २६ | कृत्रिम अवयव उपचार |
| २७ | फुफ्फुसाच्या आजारावरील उपचार | २८ | किरणोत्सर्गाव्दारे कर्करोग चिकित्सा |
| २९ | संधिवात सबंधी उपचार | ३० | जठर व आंत्र विकाराच्या शस्त्रक्रिया |
| ३१ | कर्करोगाच्या शस्त्रक्रिया | ३२ | मुत्रवह संस्थेच्या विकारांवरील शस्त्रक्रिया |
| ३३ | मानसिक आजार | ३४ | जबडा व चेहऱ्याच्या अस्थींवरील शस्त्रक्रिया |

उपरोक्त विशेष सेवांतर्गत येणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचारांची यादी व त्यांचे पॅकेज दर याची सविस्तर माहिती योजनेचे संकेतस्थळ www.jeevandayee.gov.in येथे ऑपरेशनल गाईडलाइन्स या मुख्य शिर्षाखाली पॅकेज किंमत या सदराखाली दिली आहे. तसेच म.ज्यो.फु.ज.आ. व प्र.मं.ज.आ. योजनेच्या ९९६ उपचारांपैकी १३१ उपचार आणि प्र.मं.ज.आ. योजनेच्या २१३ उपचारांपैकी ३७ उपचार केवळ शासकीय रुग्णालयांसाठी राखीव ठेवण्यात आल्याची माहिती देखील सदर मुख्य शिर्षाखाली शासकीय राखीव उपचार या सदराखाली उपलब्ध आहे.

अंगीकृत रुग्णालयांना दिल्या जाणाऱ्या पॅकेजच्या दरामध्ये सर्वसाधारण वॉर्डमधील खाटाचे शुल्क, परिचारिका शुल्क, विशेषज्ञ, भूलतज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचे शुल्क, तपासणी शुल्क, भुल, ऑक्सीजन, ऑपरेशन थिअटर व अतिदक्षता शुल्क, शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याची किंमत, औषधे व द्रव्ये, कृत्रिम अवयवाची किंमत, रक्त संक्रमणाचे दर (राज्य शासनाच्या धोरणानुसार रक्त पुरविणे), इन्प्लॅाट, एक्स-रे व निदान चाचण्या, आंतररुग्णास भोजन, डिस्पोजेबल व कन्झुन्मेबल, राज्य परिवहनाच्या दरानुसार किंवा रेल्वेच्या व्दितीय श्रेणी भाडे यानुसार वाहतुक खर्च (रुग्णालय ते रुग्णाचे निवासापर्यंत) या खर्चाचा समावेश आहे. पॅकेज दरामध्ये रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यापासून ते घरी जाईपर्यंतच्या तसेच उपचारादरम्यान काही गुंतागुंत झाल्यास त्यासह संपुर्ण खर्चाचा अंतर्भाव असून लाभार्थ्यास सर्व सेवा नि:शुल्क पुरवावयाची आहे. जर रुग्णाचा मृत्यू झाला तर रुग्णाचा मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत घेऊन जाण्याचा खर्च पॅकेजमध्ये समाविष्ट आहे.

**अंगीकृत रुग्णालये** – एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत ९८९ अंगीकृत रुग्णालयांमार्फत लाभार्थ्यांना वैद्यकीय उपचार पुरविण्यात येत आहेत. यामध्ये २९६ शासकीय व ६९३ खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे. एकत्रित योजनेंतर्गत लाभार्थ्यांना उपचार पुरविण्याकरिता सबंधित अंगीकृत रुग्णालये, तृतीय पक्ष प्रशासक कंपनी व विमा कंपनी यांच्यामध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करारनामा करण्यात आला आहे. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयामध्ये लाभार्थी रुग्णाची नोंदणी व त्यास योजनेसंदर्भाने आवश्यक ती माहिती पुरविण्याकरिता आरोग्यमित्राची नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हानिहाय अंगीकृत रुग्णालये, वैद्यकीय सेवांनिहाय अंगीकृत रुग्णालये इ. संदर्भाने आवश्यक अधिक माहिती www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळावर Network Hospitals येथे उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे रुग्णालय अंगीकरणाकरिता Hospitals>Hospital Empanelment Request येथे भेट दयावी.

# योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व कालमर्यादा

| अ.क्र. | सेवा | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | उपचार/शस्त्रक्रियेस पुर्वमान्यता | १२ तास |
| २ | आपत्कालीन दुरध्वनी सेवा | तात्काळ |
| ३ | अंगीकृत रुग्णालयास दावे अदा करणे (परिपुर्ण कागदपत्रांसह) | १५ कार्यालयीन कामकाजाचे दिवस |

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेविषयी माहिती घेण्यासाठी तसेच योजनेंतर्गत मिळणाऱ्या सेवांबाबत तक्रार करण्याकरिता कॉल सेंटरची सुविधा उपलब्ध आहे. उपरोक्त सेवा/सुविधा मिळण्यास कोणतीही अडचण/विलंब झाल्यास, १५५ ३८८ अथवा १८०० २३३ २२०० या नि:शुल्क (टोल फ्री) दुरध्वनी क्रमांकावर तक्रार दाखल करता येईल किंवा लेखी तक्रार अर्ज या कार्यालयास पाठविता येईल. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १४५५५ व १८०० १११ ५६५ या नि:शुल्क (टोल फ्री) दुरध्वनी क्रमांकावर योजनेविषयी अधिक माहिती प्राप्त करता येईल अथवा तक्रार दाखल करता येईल.

# नियामक परिषद

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून लागू करण्यात आली. त्यानुसार प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांच्या धोरणात्मक बाबींसाठी निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि.२१ सप्टेंबर,२०१८ अन्वये खालीलप्रमाणे नियामक परिषद गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | उपाध्यक्ष |
| ३ | सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४ | सचिव, ग्रामीण विकास विभाग | सदस्य |
| ५ | सचिव, नगरविकास विभाग | सदस्य |
| ६ | सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| ७ | सचिव,कामगार विभाग | सदस्य |
| ८ | आयुक्त, आरोग्य सेवा  तथा अभियान संचालक | सदस्य |
| ९ | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी | सदस्य सचिव |
| १० | संचालक, आरोग्य सेवा संचालनालय | सदस्य |
| ११ | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | सदस्य |
| १२ | राष्ट्रीय आरोग्य अभिकरणाचे प्रतिनिधी | सदस्य |

शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९ मधील निर्देशानुसार, उपरोक्त गठीत नियामक परिषदेच्या वर्षात किमान दोन बैठका आयोजित करावयाच्या आहेत.

# राज्य सनियंत्रण व कार्यकारी समिती

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी योजनेत उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक व महत्त्वुपर्ण बाबींवर निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे राज्य सनियंत्रण व कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी | सदस्य |
| ४ | संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ५ | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ६ | संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई | सदस्य |
| ७ | विमा कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक | सदस्य |
| ८ | अंमलबजावणी सहाय्य्य संस्थेचे प्रकल्प प्रमुख | सदस्य |
| ९ | अंमलबजावणी सहाय्य्य संस्थेचे मुख्य वैद्यकीय सल्लागार | सदस्य |
| १० | उपमुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य सचिव |

राज्य सनियंत्रण व कार्यकारी समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार आयोजित करावयाची आहे.

उपरोक्त दोन समित्यांशिवाय राज्य स्तरावर समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समिती, अंतिम दावे निराकरण समिती, राज्य तक्रार निवारण समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती या समित्यांचे गठन करण्यात आले आहे.

# सहयोगी विमा कंपनी व तृतीय पक्ष प्रशासक कंपन्या

विद्यमान महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांना सार्वजनिक क्षेत्रातील युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी या विमा कंपनीमार्फत विमा संरक्षण पुरविण्यात येत आहे. सदर विमा कंपनीकडून राज्य व जिल्हा स्तरावर योजनेचे कामकाज करण्यासाठी भारतीय विमा नियामक प्राधिकरणाकडील मान्यता प्राप्त तृतीय पक्ष प्रशासक कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तृतीय पक्ष प्रशासक कंपनी | अंतर्गत येणारे जिल्हे | एकूण जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | मे. एमडी इंडीया हेल्थ इन्श्युरन्स टिपीए लिमिटेड | अहमदनगर, अकोला, अमरावती, बीड, भंडारा, धुळे, गडचिरोली, गोंदिया, जालना, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, वाशिम, | २० |
| २ | मे. मेडी असिस्ट इन्श्युरन्स टिपीए प्रा.लि. | औरंगाबाद,बुलढाणा,चंद्रपुर,जळगाव, मुंबई शहर, मुंबई उपनगर, वर्धा, यवतमाळ | ८ |
| ३ | मे. पॅरामाऊंट हेल्थ सर्व्हीसेस ॲन्ड | हिंगोली, कोल्हापूर, परभणी, पुणे, सांगली, | ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | इन्श्युरन्स टिपीए प्रा.लि. | सोलापूर | |
| ४ | हेल्थ इन्श्युरन्स टिपीए ऑफ इंडिया | पालघर, ठाणे | २ |

उपरोक्त तृतीय पक्ष प्रशासक कंपन्यांकडून राज्य व जिल्हा स्तरावर योजनेच्या अंमलबजावणीकरिता मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे.

# सोसायटी मुख्यालयातील कामकाज

राज्य आरोग्य हमी सोसायटी अंतर्गत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचे संनियत्रण होण्यासाठी दैनंदिन कामकाज करण्यासाठी खालीलप्रमाणे शाखा कार्यान्वित आहेत.

| अ.क्र. | शाखेचे नाव | अ.क्र. | शाखेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना | १० | दावे (क्लेम्स) |
| २ | प्रशासन | ११ | तक्रार निवारण |
| ३ | लेखा | १२ | ग्राहक सेवा, कॉल सेंटर व सीएम फीडबॅक |
| ४ | रुग्णालय अंगीकरण | १३ | माहिती तंत्रज्ञान |
| ५ | आरोग्य पत्र | १४ | रुग्णालय वैद्यकीय परिक्षण (मेडीकल ऑडीट) |
| ६ | माहिती, शिक्षण व संवाद | १५ | क्लिनीकल प्रोटोकॉल |
| ७ | क्षेत्रीय कार्यान्वयन | १६ | सांख्यिकी |
| ८ | उपचारपूर्व मान्यता (प्रि-ऑथोरायझेशन) | १७ | धर्मादाय रुग्णालये |
| ९ | आरोग्य शिबीर | १८ | माहिती अधिकार |

# क्षेत्रीय कार्यान्वयन

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचे क्षेत्रीय स्तरावर संनियंत्रण होण्यासाठी प्रत्येक महसुल विभागात राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत क्षेत्रीय व्यवस्थापक व प्रत्येक जिल्हयात जिल्हा समन्वयक ही पदे कार्यरत आहेत. जिल्हा समन्वयक हे जिल्हयांतील अंगीकृत रुग्णालयांना नियमित भेटी देणे, जिल्हा प्रशासनाशी समन्वयन साधणे, योजनेंतर्गत कार्यरत समित्यांच्या बैठकांचे आयोजन करणे, लोकप्रतिनिधींशी समन्वयन साधणे, आरोग्य शिबीराचे आयोजन इ. संदर्भात महत्त्वपुर्ण भुमिका पार पडत आहेत. सदर जिल्हा समन्वयकांच्या कामकाजावर क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापकांमार्फत व मुख्यालय स्तरावर व्यवस्थापक (ऑपरेशन्स) आणि महाव्यवस्थापक (ऑपरेशन्स) यांचेव्दारे देखरेख व नियंत्रण ठेवण्यात येते. सध्या कार्यरत क्षेत्रीय व्यवस्थापक व जिल्हा समन्वयक यांच्या संपर्काचा तपशील www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळावर staff directory मध्ये उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर आरोग्यमित्र, पर्यवेक्षक, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, जिल्हा दक्षता अधिकारी व जिल्हा प्रमुख असे मनुष्यबळ एकत्रित योजनेच्या अंमलबजावणीकरिता तृतीय पक्ष प्रशासक कंपन्यांकडून नियुक्त करण्यात आले आहे.

**कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभुमीवर घेण्यात आलेले निर्णय:**

कोविडग्रस्त रुग्ण व अन्य रुग्ण यांना खाजगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी आकारण्यात येणाऱ्या दरावर शासनाने नियंत्रण आणले असून काही आजारावरील उपचार, तपासण्या व चाचण्या यांचे दर दि.२१ मे,२०२० रोजीच्या शासन अधिसूचनेव्दारे ठरवून देण्यात आले आहेत तसेच खाजगी रुग्णालयांतील ८०% खाटा हया शासनाकरिता राखून ठेवण्यात आल्या आहेत. राज्यस्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी व जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त यांना सदर तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर अधिसूचना दि.३१ मे, २०२१ पर्यंत वैध आहे.

कोरोना-१९ साथरोगाच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्याकरिता लाभार्थी रुग्णांबरोबर योजनेचे लाभार्थी नसलेल्या इतर रुग्णांना देखील महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये कोविड-१९ साठी दि.२३ मे,२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये उपचार अनुज्ञेय करण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याला रहिवाशी पुरावा म्हणून वैध पिवळी, केशरी, शुभ्र शिधापत्रिका, तहसिलदार यांचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र यांपैकी कोणतेही एक पुरावाजन्य कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. कोरोना साथीचे गांभीर्य, उपचाराची तातडी पाहता कोरोना उपचारासाठी आवश्यक कागदपत्रात शिथीलता देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांना देण्यात आले आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थी नसलेल्या राज्यातील रहिवासी असलेल्या उर्वरीत नागरिकांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील ९९६ उपचारांचा लाभ मान्यता प्राप्त दराने सर्व अंगीकृत रुग्णालयांमध्ये दि.२३ मे,२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे.

कोरोना साथरोगामध्ये शासकीय रुग्णालये ही कोविड रुग्णालये म्हणून घोषित झालेली परिस्थिती पाहता, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट नसलेले काही किरकोळ व काही मोठे उपचार आणि काही तपासण्या हया योजनेतील अंगीकृत रुग्णालयांमध्ये सर्व लाभार्थ्यांना (योजनेंतर्गत लाभार्थी असलेले व नसलेले) CGHS (Central Government Health Scheme) च्या नमूद दरानुसार दि.२३ मे,२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

दि.२३ मे,२०२० च्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात आलेल्या निर्णयास दि.५ एप्रिल,२०२१ च्या शासन निर्णयानुसार दि.३१ मार्च,२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती तथापि कोरोना साथरोगाचा वाढता प्रार्दुभाव लक्षात घेता महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत वरीलप्रमाणे देण्यात येणारे लाभ माहे जून,२०२१ पर्यंत सुरु ठेवण्याकरिता शासनास प्रस्ताव सादर केला असून तो शासन स्तरावर विचाराधीन आहे.

कोविड-१९ ग्रस्त रुग्णाची नोंदणी योजनेच्या खाजगी अंगीकृत रुग्णालयात केल्यानंतर Critical care, Pulmonology, Nephrology, Pediatric Medical Management, Endocrinology या तज्ञ सेवांच्या २० उपचारांसाठी पूर्व परवानगी (Preauthorization) घेतल्यास या लाभार्थ्यांच्या कोविड-१९ (RtPCR) चाचण्या शासनामार्फत मोफत करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.३० जुन,२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

-------------------------------